**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**
**परिवहन महामंडळामार्फत नव्याने औद्योगिक संस्था/शासकीय/निमशासकीय**
**कर्मचाऱ्यांकरीता बसेस मागणीनुसार**
**'विशेष बससेवा' सुरू करणेबाबत. अटी व शर्ती**

१) विशेष बससेवेचे संचलन कर्मचाऱ्यांकरिता सोयीस्कर व सुरक्षित होण्यासाठी देण्यात येणाऱ्या बसेस तांत्रिकदृष्ट्या सक्षम व आपल्या कार्यालयानजीकच्या डेपोच्या देण्यात येतील.

२) औद्यौगिक उद्योगधंदे/कार्यालये सुरू झालेवर ज्या मार्गावर विशेष बससेवेचे संचलन करावयाचे आहे. अशा मार्गाच्या मागणीचे स्वतंत्र पत्र अथवा ईमेल आयडीद्वारे देण्याचे करावे. (ई मेल आयडी – tmope@pmpml.org)

३) निश्चित झालेला मार्ग संचलनाचे कि.मी. महामंडळाकडुन पडताळणी/निश्चित करून घ्यावयाचे आहेत. सन २०१९-२० मध्ये महामंडळास येणारा प्रति कि.मी. खर्च रूपये ८३.५१/- प्रति कि.मी. प्रमाणे आकारणी करण्यात येईल अथवा प्रतिमहा किमान २००० कि.मी. व २२ दिवस कामाचे (वर्किंग डे) व त्यापुढील दिवसाकरीता जास्त होणाऱ्या कि.मी. प्रमाणे दरआकारणी करण्यात येईल. तथापी प्रतिवर्षी महामंडळाच्या (सीपीके) खर्चानुसार सदरचा दर बदलत असतो.

४) बँक गॅरंटी देणे किंवा एक महिन्याचे अगाऊ भाडे अनामत रक्कम म्हणून परिवहन महामंडळाकडे भरणे आवश्यक आहे.

५) बिलाची रकमेची आकारणी मासिक महिना प्रमाणे उदा. १ ते ३० किंवा १ ते ३१ अशाप्रमाणे करण्यात येईल.

६) वरील निश्चित केलेल्या भाडे दरानुसार होणाऱ्या कि.मी. दरानुसार महिन्याचे मासिक भाडे रक्कम होईल ती रक्कम महामंडळाकडे दरमहा सात दिवसात संबंधित औद्योगिक कंपनी/कार्यालय समन्वयाचे माध्यमातुन आरटीजीएस/धनादेशाद्वारे जमा करावयाची आहे.

७) सदर बसेसना फक्त चालक देण्यात येईल, कर्मचारी सुरक्षेची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

८) सदरची सेवा निश्चित केलेल्या रूटवर दिली जाईल.

९) प्रतिमाह भाडे रक्कम वेळेत न भरल्यास व्याजासह आकारणी व वसूली करण्यात येईल.

वरील अटी-शर्तींमध्ये महामंडळास आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहणार आहेत.



Scanned with CamScanner